

।। श्री स्वामी समर्थ ।।

।। श्री स्वामी समर्थ ।।

**श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास मार्ग (दिंडोरी प्रणीत) सेवेकरी**

**श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर मुल गोदावरीचे वंशपरंपरागत तिर्थोपाध्याय**

# वे. लक्ष्मीकांत उर्फ मनोज मधुकर काणणव (गुरुजी)

## पुत्र-रुद्रेश



* ज्योतिष प्राज्ञ, ज्योतिष विशारद(नाशिक) * ज्योतिष भास्कर (पुणे), टॅरोट कार्ड रिडर(पुणे) * ज्योतिर्विद्या वाचस्पती (पुणे), डाऊझर (पुणे)

**त्र्यंबकेश्वर गावात आल्यानंतर गुरुजींना फोन न करता याच पत्त्यावर भेटण्यास यावे.**


*** गुरुजींचा पत्ता :** घ.नं.२०६, 'शिव अंबिका' सदन, संत श्री निवृत्तीनाथ महाराज रोड, कुशावर्त तिर्थ चौक, श्री गंगा गोदावरी माता मंदिरा मागे, मु.पो.ता. त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक-४२२२१२. Website : www.kaalsarp.net

दूरध्वनी व मोबाईलवर स. ९ ते सायं. ७ याच वेळेत संपर्क साधावा. मो.: ८६०५५१३०३६, (०२५९४) २३३५०४

**मनोज गुरुजी व्हॉटस्अप मोबाईल नं :- ९८२२०४३३२६**


**विशेष सुचना :** मनोज गुरुजींचे धार्मिक विधींचे व्यस्ततेमुळे मनोज गुरुजींचा मोबाईल न उचलल्यास आपले गुरुजींकडे अतिमहत्त्वाचे काही काम असल्यास मनोज गुरुजींच्या **९८२२०४३३२६** ह्या मोबाईल नंबरवर एस.एम.एस. किंवा व्हाटस्अप मॅसेज दिवसभरात कधीही करावा व मोबाईलवर बोलण्याचे असल्यास सायं. ७ ते रात्री ९ वा. पर्यंत कॉल करावा.

**टिप :** रात्री ९ ते पहाटे ४.३० वाजेपर्यंत गुरुजींच्या घरी प्रवेश दिला जाणार नाही, कृपया फोन अथवा मोबाईलवर सुद्धा या वेळेत संपर्क करु नये.

## * नारायणबली-नागबली विधीची माहिती *

* कृपया खालील नियमांचे काळजीपूर्वक वाचन करुनच त्र्यंबकेश्वरी विधी करता यावे *

राष्ट्राचे खरे वैभव म्हणजे मानव. तो जर सुखी असेल तर राष्ट्राची प्रगती, उन्नती होईल. आपण सुखी व्हावे यासाठी प्रत्येक मानव प्रयत्न करीत असतो. पण प्रत्येकाला यश येईलच, असे नाही. कारण पूर्वकर्मानुसार व प्रारब्धानुसार व काही भोग भोगण्यासाठी त्याला मानव देह धारण करावा लागतो व ते भोग भोगावेच लागतात. पण त्यातीलच काही भोग हे मानवनिर्मित असतात व असे भोग पुजाविधी, जप, तप, दान, धर्म, शांतिक, होम हवन, श्राद्धकर्म इ. करुन परमेश्वराला प्रसन्न करुन घेऊन त्या भोगाची तिव्रता कमी करता येते. नारायणबली नागबली हा विधी अतृप्त जीवात्म्यांना गती देण्याकरीता केला जातो. आपले मन एवढे विशाल आहे की, या जन्माचे मागच्या जन्माचे विचार आपण या मनात साठवून ठेवले आहेत. परंतु मनाच्या भोवती वासनेचे वलय असते. मन हे वासनेने गुरफटलेले असते. सर्वच वासना तृप्त होतात, असे नाही तर काही तीव्रतर वासना मरेपर्यंत शिल्लक राहून मृत्यू येतो. जसे की घरात कोणाचा ब्रम्हचारी अवस्थेत मृत्यू होणे, सर्पदंशाने, सिंह, वाघ इ. हिंस्त्र पशुपासून मृत्यू होणे, स्त्रीहत्या, बालहत्या, गोहत्या घडल्याने, अपघाताने, अचानक आजारपण येऊन मृत्यू होणे, आत्महत्या, विष पिऊन, गळफास घेऊन, पाण्यांत बुडून, अग्नित जळून, क्षयरोगाने, विजेच्या धक्क्याने, श्वास अडकून, अति आहाराने, साथीच्या रोगाने, देशाबाहेर मृत्यू झाल्याने, परागंदा होणे, पुत्र संतती न झाल्याने, और्ध्वदैहिक, अंत्येष्टी, प्रेतक्रीया, दशांतक्रिया, सपिंडी न झाल्याने, पंचक, त्रिपाद, दक्षिणायनात तसेच अपरात्री मृत्यू येणे हे सर्व दुर्मरणात येतात. त्यावेळी तो जीवात्मा पृथ्वीतलावरच हिंडायला लागतो. जसे पाणी समुद्राकडे जाते. कारण मेघ हे समुद्रापासून तयार होतात. म्हणून पाणी समुद्राकडे जाते. आपला जीवात्मा हा सूर्याचा अंश असल्याने त्याची गती सुर्याकडे व्हावयास पाहिजे. परंतु वासना ही जड असल्याने ती या जीवात्मांना खाली खेचते.

वासनेचाच जोर झाला म्हणजे हा जिवात्मा पृथ्वीवरच भटकत राहतो. म्हणजेच तो दुर्गतीला गेला असा याचा अर्थ होतो. या जीवात्मांना तहान, भूक लागते तेव्हा ती भागविण्यासाठी जड देह नसल्या कारणाने तो तमोगुणी बनतो. आपल्या घरी गेल्याशिवाय यातून आपली सुटका होणार नाही, हे जाणून तो आपल्या वासनेशी संबंधित असलेल्या माणसांकडे येऊन त्यांच्या मनात प्रवेश करुन संसारात अडचणी निर्माण करतो, पिता व मातेचे सात पिढीतील दोषांचे वहन पुढच्या पिढीमध्ये करतो, त्यालाच पितृदोष लागलेला आहे असे समजावे. त्याने शापसूचक भयंकर वाईट स्वप्ने पडतात. संततीस प्रतिबंध होतो. पती-पत्नी वैदयकीय दृष्ट्या संतान प्राप्तीसाठी सक्षम असूनही संतानप्राप्ती- विशेष करुन पुत्र संतती होत नाही. वेडसर, मतीमंद, विकलांग संतती जन्माला येते. मुलीच होतात तिसऱ्या पिढीनंतर निर्वंश होतो. नोकरी, उद्योग शेती व्यवसायांत अपयश येते, कर्जबाजीरपणा येतो, संतती व्यसनाधिन होऊन वाममार्गाला लागते, कुटुंबामध्ये कलह वाद होतात. घरात पुरेसे अन्नधान्य भरुनही पुरत नाही. बनवलेले अन्न वाया जाते (हे अन्न बाहेर कोणताही प्राणी खात नाही) जेवतांना हमखास काहीतरी वाद होतात. घराला उतरती कळा लागते, आंतरजातीय विवाह होतात- वैवाहिक अडचणी सुरु होतात, विवाह योग्यवेळी जमत नाही, उशीरा विवाह होतात. विवाह झाला तर वैवाहिक सौख्यांत अडचणी निर्माण होतात, सुखाचा संसार सुरु असतांना पती किंवा पत्नीचा त्याग करणे, घटस्फोट होणे, कुळधर्म, कुळाचारात अडथळे येणे, त्यांत मन न लागणे, त्यांवर विश्वास न बसणे, असाध्य रोग जडतात. डोळ्यांचे विकार, हृदयविकार , निद्रानाश, टी.बी. मधुमेह, अर्धांगवायु, मेंदूचे विकार, कॅन्सर, साथीचे रोग इ. रोगांची सतत पीडा होत असते. वैद्यकीय रिपोर्ट नॉर्मल असूनही सर्व वेळ, पैसा विनाकारण आजारपणात खर्च होतो. पैसा खर्च होऊनही रोगांचे निदान होत नाही. अनैसर्गिक अकाली मृत्यू होतात. घरातील कर्तापुरुष, तरुण मुलगा यांचा अचानक मृत्यू होतो. मृत्यूचे निदान होत नाही. दिर्घ आजारपण सुरु असतात, आकस्मिक शस्त्रक्रियेला सामोरे जावे लागते. वरीष्ठ, नातेवाईक, मित्रांकडून त्रास होतात. शत्रुत्व निर्माण होते, शत्रूपासून वारंवार उपद्रव सहन करावे लागतात. सर्व बाजूंनी संकटे येतात, कोर्टकचेरी झगडे सतत पाठीमागे सुरु होतात. तुरुंगवास भोगावा लागतो. पुण्यकृत्ये लागू न होत नाही. त्यांमुळे श्रद्धा डळमळीत होणे, घराण्यांत कुटुंब विभक्त होतात व होणारी शुभ कार्ये बंद होतात, वारसा हक्क जातो, प्रतिष्ठा संपुष्टात येते. शैक्षणिक अडचणी येतात, प्रत्येक कार्यात अपयश येते. आर्थिक, मानसिक, शारीरिक समस्या निर्माण होतात. बुडीत स्थळाची संपत्ती मिळणे, परद्रव्याचा अपहार केला जातो. एखाद्या व्यक्तीवर, वस्तूवर, घरावर, पैश्यावर, संपत्तीवर आसक्ती राहून मृत्यू आला तर पूर्वकर्मानुसार अनेक सुखांचा नाश होतो. त्याकरीता नारायणबली विधी करावा.

नारायणबली विधीमध्ये और्ध्वदैहिक म्हणजे प्रेतावर मृत व्यक्तीवर जे श्राद्ध करतात ते श्राद्ध करुन त्या जिवात्माच्या मूळ वासनेचा क्षय केला जातो. वासनेचाच क्षय झाला म्हणजे तो वायुसमान हलका होऊन वरती जातो व अदृश्य स्वरुपात होणारा त्रास आपोआपच कमी होतो व तो जीवात्मा त्यांस गती दिल्याने अनेक उत्तम आशीर्वाद देऊन जातो व प्रेतपीडा, पिशाच्चपीडा, सर्पशाप, पितृशाप याने होणारे उपद्रव नाहिसे होतात. पुत्र संतती होते. शारिरीक पीडा, संततीला होणारी पीडा दूर होऊन आरोग्य प्राप्त होते. उद्योग व्यवसायांत येणारे अपयश, विवाहात येणाऱ्या अडचणी दूर होतात. कुटुंबामध्ये होणारे कलह दूर होतात. एकूण अनेक दोष नाहीसे होऊन सुख प्राप्त होते. नारायणबली बरोबरच नागबली हा विधी करण्यासाठी शास्त्रांत सांगितलेले आहे. नागबली हा विधी शौनक ऋषींनी सांगितला आहे. नाग योनीचा मनुष्य योनीशी निकटचा संबंध आहे. एखाद्याने पुष्कळ द्रव्यसंग्रह केला व त्यावर त्याची आसक्ती राहिली तर तो मृत झाल्यावर त्या धनावर नाग होऊन बसतो. तो ते धन कोणालाही घेऊ देत नाही. सर्प कुलात नाग हा श्रेष्ठ आहे. अशा नागाची या जन्मात अगर जन्मांतरात हत्या झाली तर त्याचा शाप मिळतो. त्यामुळे पण पुत्र संततीला प्रतिबंध होतो. शिवाय काही रोग उत्पन्न होतात. वात, पित्त, कफ त्रिदोषजन्य ज्वर, उदरशूळ (पोटाचे विकार), गंडमाला (गळ्याचे विकार), विषरोग, कुष्ठरोग (महारोग), नेत्रकर्णमुल (कान, नाक, डोळ्याचे आजार), मधुमेह आदी रोग उत्पन्न होतात. त्यासाठी औषधे घेऊन पण गुण येत नाही. असे होत असेल तर हे सर्पवधाने उत्पन्न झालेले रोग आहेत, असे समजावे याकरीता नागबली विधी करावा. त्याने वरील दोष दूर होतात.

नारायणबली-नागबली हे दोन्ही विधी काम्य आहेत. नारायणबली-नागबली विधीसाठी आपणांस ३ दिवस त्र्यंबकेश्वरी राहावे लागते, आई-वडील ह्यात असतांना सुद्धा हा विधी करता येतो. विधीसाठी येतांना आपण अविवाहीत असाल तर एकट्याने पूजेस बसावे, विवाहीत असाल तर पती-पत्नीने पुजेस बसावे. फक्त मुलगी अथवा एकट्या स्त्रीस पुजेस बसता येत नाही. शास्त्रानुसार सदर विधीसाठी आपल्या वार्षिक उत्पन्नाचा दहावा भाग खर्च करावा असे आहे, तरी आपण आपल्या शक्तिनुसार यथाशक्ती खर्च विधीसाठी करावा. नारायणबली-नागबली, राहु कालसर्पयोग शांती व त्रिपिंडी श्राद्ध विधीचे मुहूर्त पाठीमागे दर्शविल्याप्रमाणे आहेत. मुहूर्ताचे आदले दिवशी मुक्कामास यावे व येण्याचे ४ दिवस अगोदर फोनने संपर्क साधून बुकींग करणे आवश्यक आहे म्हणजे आपल्या विधीची गैरसोय होणार नाही. तसेच येतांना हे पत्रक सोबत आणावे. बुकींग करुन काही करणास्तव रद्द झाल्यास कृपया कळवावे. आपणांस राहण्याच्या व्यवस्थेची गैरसोय होऊ नये म्हणून पाठीमागे दर्शविलेल्या विधीचे मुहूर्तांचे आदले दिवशी दुपारी १२ वाजेपर्यंत त्र्यंबकेश्वरी मुक्कामास यावे. गर्दीमुळे रुम मिळत नाही, राहण्याची व्यवस्था गुरुजींनी सांगितल्या प्रमाणे आपण स्वत: लॉज, धर्मशाळेत जाऊन करावी. राहण्याच्या व्यवस्थेची रुमची बुकिंग होत नसल्यामुळे व आपणास काही कारणास्तव येण्यास उशीर झाल्यास राहण्याच्या व्यवस्थेची जबाबदारी गुरुजी घेणार नाही. गुरुजींना देत असलेल्या दक्षिणेव्यतिरिक्त राहण्याचा खर्च आपणांस करावयाचा असतो. पुजेस बसलेल्या फक्त पती-पत्नीचीच जेवणाची व्यवस्था केली जाते. सोबत आणलेल्या व्यक्तींची जेवणाची व्यवस्था बाहेर करावी लागते. कुटुंबातील इतर व्यक्तींचे काम नसल्यामुळे शक्यतो त्यांना आणू नये व अनावश्यक होणारे खर्च टाळावेत. दररोज दोन वेळेस विधीपूर्वी व विधीनंतर थंड पाण्याने कुशावर्त तीर्थावर स्नान करावे लागते. त्यामुळे अतिवृद्ध व्यक्तीस त्यांची शारीरिक क्षमता असेल तरच त्यांना पुजेस बसवावे अन्यथा कुटुंबातील दुसऱ्या व्यक्तीकडून हा विधी करुन घ्यावा. आपणाकडे मांगलिक कार्य लग्न-मौंजी वगैरे झाली असेल अथवा एखादी व्यक्ती मृत झाली असेल तर आणि सदर विधी पूर्वी केलेला असेल व दुसऱ्यांदा पुन्हा करावयाचा असेल तर मराठी महिन्याप्रमाणे १ वर्ष झाल्याशिवाय दुसऱ्यांदा हा विधी करु नये. आपण परत जातांना कुणाही नातेवाईकाकडे न जाता सरळ आपल्या घरी जावे. तसेच सव्वा महिना कोणाकडेही परान्न घेऊ नये. आमचेकडे एक वस्त्रीस्नान, तीर्थश्राद्ध, विष्णूबली, कुंभविवाह, वास्तुशांती, नवचंडी याग, सर्व प्रकारच्या जननयोग शांती, अभिषेक, लघुरुद्र, महारुद्र, महामृत्यूंजय जप वगैरे सर्व धार्मिक विधी शास्त्रोक्त पद्धतीने अगदी घरच्यासारखे करुन दिले जातात. तसेच ज्योतिष विषयक संपूर्ण योग्य मार्गदर्शन मिळते. या सर्व बाबतीत उपयुक्त माहिती व सल्ल्यांसाठी संपर्क साधणे. श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे आद्य ज्योर्तिलिंग त्र्यंबकेश्वर मंदिर, तीर्थराज कुशावर्त, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, श्री निवृत्ती नाथ मंदिर, गोदावरी उगम स्थान (ब्रह्मगिरी व गंगाद्वार पर्वत) नील पर्वत इत्यादी दर्शनीय स्थळे आहेत. पावसाळ्यात छत्री, बॅटरी व हिवाळ्यात गरम कपडे सोबत आणावेत. विधी पूर्ण झाल्यानंतर घरी परत जातांना गुरुजींनी सांगितल्याप्रमाणे त्र्यंबकेश्वरी श्री स्वामी समर्थ गुरुपीठात कुलदैवतेचा मान सन्मान करुनच जावे. तसेच विधी झाल्यानंतर जवळच्या श्री स्वामी समर्थ केंद्र किंवा आपले गावांत पितृ स्मरणार्थ एक झाड लावून ते झाड जगविण्याची जबाबदारी घ्यावी.

## त्रिपिंडी श्राद्ध

**श्राद्धाचे एकूण पाच प्रकार आहेत.** १) और्ध्वदैहिक (प्रेतावर मृत व्यक्तीवर केले जाणारे श्राद्ध) २) सांवत्सरिक (प्रत्येक वर्षाच मृत तिथीला होणार श्राद्ध), ३) पार्वण किंवा महालय (भाद्रपद कृष्णपक्षातील केले जाणारे श्राद्ध), ४) तिर्थ श्राद्ध, ५) नारायणबली नागबली व त्रिपिंडी श्राद्ध (काम्य श्राद्ध) मनातील विशिष्ट हेतू पूर्ण करून घेण्याकरीता केलेले श्राद्ध म्हणजे काम्य श्राद्ध.

त्रिपींडी श्राद्ध हे काम्य श्राद्ध असून हे करण्यामागचा उद्देश सतत तीन वर्षे पितरांचे सांवत्सरिक (वर्षश्राद्ध) व महालय श्राद्ध, झाले नाही तर पितरांना प्रेतयोनी प्राप्त होते. ते दूर होण्याकरीता हे श्राद्ध करावे. पितृ कर्माचा लोप, श्राद्धकर्म, और्ध्वदैहीक सशास्त्र न झाल्याने शिवाय भुत प्रेत, यक्ष, गंधर्व, राक्षस, शाकिनी, रेवती, जृंभक आदींच्या पिडा उत्पन्न होऊन घरात अशांतता निर्माण होते. तसेच एक दिवसाचे, तीन दिवसाचे, पंधरा दिवसाचे अंतराने हिवताप येतो. घरात कलह निर्माण होतात. सुखशांती मिळत नाही. विवाह जमत नाही. मृत व्यक्ती स्वप्नात येतात. समृद्धीला उतरती कळा लागते. याकरीता त्रिपींडी श्राद्ध करावे. या विधीमध्ये ब्रम्हा, विष्णू व रुद्र या देवता आहेत. त्या दिविस्थ, अंतरिक्षस्थ, भुमीस्थ तसेच सत्व, रज, तमोगुणी, बाल, तरुण, वृद्ध अवस्थेतील अनादिष्ट प्रेतांना सद्गती देतात.

मागे पहा

# ✻ राहु कालसर्पयोग शांती विधीची माहिती ✻

।। राहु-केतु अंतराले सर्वेग्रहाः नभस्थिता । कालसर्प योगारव्येन सर्व सौख्य विनाशक ।।

आधुनिक विज्ञानाने जरी बरीच प्रगती केलेली असली तरी निसर्गाचे अनेक नियम विज्ञानाच्या कक्षेत आलेले नाहीत. आपल्या ऋषीमुनींनी हजारो वर्ष तपश्चर्या करुन जे उपाय सांगितले ते करुन आपले जिवन सुखी करता येते. प्रत्येक मानवाच्या जिवनात संकटात, अडचणी व दुःखात ज्योतिषी एक महत्त्वाचा मार्गदर्शक असतो. पृथ्वीवरील मानवी जीवनावर आकाशातील प्रत्येक ग्रह, तारे वेगवेगळ्या स्वरुपांतील ऊर्जेने मानवी जीवनावर शुभ-अशुभ परीणाम करतात. ज्याप्रमाणे चंद्राच्या प्रभावाने समुद्राला भरती-ओहोटी येते. सुर्याच्या प्रभावाने संपूर्ण निसर्गचक्र चालते, त्याप्रमाणे पृथ्वीवरील मानवी जीवन शुभ-अशुभ स्थितीत ग्रहांचा परिणाम अनुभवतात. यामंध्ये काही ग्रह शुभ तर काही ग्रह अशुभ परिणाम घडवितात. त्यांमध्ये राहू आणि केतूच्या मध्ये एकाच बाजूला सर्व ग्रह, सुर्य, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि आले असता व शुभ ग्रहांबरोबर अशुभ परिणाम व अशुभ ग्रहांबरोबर असता अशुभ परिणामांची तिव्रता वाढवितात. शास्त्रांत राहुला सर्पाचे मुख व केतुला सर्पाचे शेपूट मानतात. राहुची आधी देवता काल व प्रत्याधि देवता सर्प असून राहु केतू दोषालाच कालसर्पयोग म्हणतात. मानवाला त्याच्या ग्रहयोगाप्रमाणे पुर्वकर्मानुसार व प्रारब्धानुसार खालीलप्रमाणे अनेक प्रकारचे त्रास, यातना, दुःख, चिंता, संकटे भोगावे लागते, अशावेळी पुजाविधी, जप-तप, दान, धर्म शांतिक, होम हवन, श्राद्धकर्म इत्यादी करुन त्या ग्रहांच्या परिणामांच्या भोगाची तिव्रता कमी करता येते व मानवाला दुःख भोगण्याची क्षमता मिळून जीवन सुखी करता येते.

राहु कालसर्पयोग शांती हा एक लहानसा यज्ञासारखा विधी आहे. ज्यांचे जन्मपत्रिकेत राहुकालसर्पयोग आहे. त्या व्यक्तीला जिवनांतील प्रगतीचे मार्ग बंद होऊन, शारीरिक, मानसिक, आर्थिक इ. अनेक प्रकारची संकटे, यातना, दुःख भोगावे लागते. प्रत्येक चांगल्या कार्यात अपयश येते, वाईट कार्यात भरभरून यश मिळते. पर्वताएवढे प्रयत्न करुनही अणुकणा एवढेही काम होत नाही. नोकरी व्यवसायात चढ ऊतार होतात. नोकरीत बढतीचे योग असतांना खालचे जागेवर रहावे लागते. जिवनभर बदनामी होते. प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी जीवनांत फार मोठे व्यर्थ संघर्ष करावे लागतात. कुटुंबात अशांतता निर्माण होते. स्थांवर ईस्टेट, संपत्तीमध्ये समस्या निर्माण होतात. वडीलोपार्जित धन, संपत्तीचा नाश होतो. आर्थिक स्थितीत चढऊतार होतात. सतत कर्ज होते. कोर्टकचेरी झगडे विनाकारण पाठीमागे सारखे चालू असते. भांडणात माघार घ्यावी लागते. निष्कारण शत्रुत्व निर्माण होते. हितशत्रू, गुप्तशत्रु, यांचा उपद्रव सहन करावा लागतो, सर्व वेळ पैसा शत्रूशी झगडण्यांत व्यर्थ खर्च करावा लागतो, ऊधार ऊसनवार दिलेला पैसा बुडतो. जमेपेक्षा खर्च जास्त होतो. आवक कमी व अनावश्यक प्रचंड खर्च होतो. उद्योग व्यवसायांत नुकसान होते. अशा व्यक्ती दुसऱ्यांना मदत करतात पण ह्यांना ऐनवेळेवर कोणीही मदत करत नाही.

मनांत वाईट विचार येतात, सतत काहीतरी भीती वाटत असते, एखाद्या दडपणाने मानसिक त्रास सुरु होतात. नातेवाईक, मित्र, नोकर विश्वासघांत करतात. विद्याअभ्यासांत अडथळे निर्माण होतात. शिक्षण अपुर्ण राहते. चुकीची शैक्षणिक निवड होते. स्मरणशक्ती क्षिण होते. बौद्धिक कार्यात अडचणी येतात.

मुलामुलींचे विवाह योग्य वेळी होत नाही, ऊशीरा विवाह होतात, विवाह झाला तरी विवाहानंतर वैवाहिक सौख्यांत अडचणी निर्माण होतात. विभक्त राहण्याची वेळ येते प्रसंगी घटस्फोटापर्यंत प्रकरण जाते. दुर्देवाने अकाली वैधव्य येते. सुखाचा संसार चालू असतांना पती किंवा पत्नीचा त्याग करणे. पती-पत्नी पैकी एकाचे निधन होऊन एकाकी जीवन जगण्यास भाग पाडले जाते. प्रेमप्रकरणांत अपयश येते. फसवणूक होते, जोडीदाराचा विरह सहन करावा लागतो. तडजोड करुन जिवन व्यतीत करावे लागते. आई-वडील, बहिण, भावंड, पती-पत्नी, संतती, नातेवाईक यांचेशी पटत नाही, मतभेद होतात. यांचेपासून उपद्रव होतात. यांचे सुख मिळत नाही. व्यसनाधिन संतती होऊन वाम मार्गाला लागते. असाध्य रोग जडतात डोळ्यांचे विकार, हृदयविकार, निद्रानाश, टि.बी., मधुमेह, अर्धांगवायु, मेंदुचे विकार, कॅन्सर, साथीचे रोग इ. रोगांची सतत पीडा होत असते. वैद्यकीय रिपोर्ट नॉर्मल असूनही, सर्व वेळ, पैसा विनाकारण आजारपणांत खर्च होतो. तरीही रोगांचे निदान होत नाही. दिर्घ आजारपण सुरु असतात. आकस्मिक शस्त्रक्रियेला सामोरे जावे लागते. अनैसर्गिक अकाली मृत्यू होतात. मृत्यूचे निदान होत नाही. जवळचे, दूरचे, परदेश प्रवासांत अडचणी येतात. सर्व प्रकारच्या सुखांचा नाश होतो, सतत काहीतरी अपघात होऊन दुर्घटना घडत असते. राजकीय, सरकारी संकटांना सामोरे जावे लागते. तुरुंगवास भोगावा लागतो. चारित्र्यवार विनाकारण शिंतोडे येतात, भाग्योदयांत अडथळे निर्माण होतात. धार्मिक कार्यात अपयश येते. एकुणच जीवनांत अनेक प्रकारचे त्रांस, यांतना दुःख निर्माण होऊन प्रकृतीमध्ये दोष, बिघाड निर्माण होऊन. जिवनामध्ये नैराश्य निर्माण होते. या व अशा अनेक कारणाने मनुष्य त्रस्त होतो ह्या व अशा अनेक प्रकारच्या पीडा दूर होण्याकरीता राहू कालसर्पयोग शांती विधी करावा.

## ✻ विधीसाठी गुरुर्जींना देत असलेल्या दक्षिणेमध्ये गुरुर्जींकडून दिले जाणारे पूजा साहित्य ✻

| नारायणबली-नागबली | राहू कालसर्पयोग | त्रिपिंडी श्राद्ध |
|---|---|---|
| कलश-६, ताम्हणे-६, पळी पंचपात्र, देवतेस आसन. तसेच विविध धातूंच्या पंचप्रतिमा, चांदीची-ब्रह्मदेव, सोने-विष्णुची, तांबे-शंकराची, लोखंड-यमाची व शिशे तत्पुरुषाची सदरचे सर्व साहित्य तसेच तीन दिवसांठी लागणारे सर्व पुजासाहित्य (पंचामृत पुजा, फुले, तीळ, गंध, अक्षता, जव, पिंडसाहित्य इत्यादी सदर साहित्य आपणांस आणण्याची आवश्यकता नाही. वरील सर्व साहित्य गुरुजींना देत असलेल्या दक्षिणेमध्येच पुरविले जाते. | कलश-६, ताम्हणे-६, चांदीच्या-९ नागप्रतिमा, राहूकाल - चांदीचे प्रतिमा पंचामृतपुजा, फुले, गंध, अक्षता, गहू, चौरंग, आसने व हवन सामुग्री इ. सदर साहित्य आपणास आणण्याची आवश्यकता नाही. वरील सर्व साहित्य गुरुजींना देत असलेल्या दक्षिणेमध्येच पुरविले जाते. | कलश-४, ताम्हणे-४, पळी पंचपात्र तसेच विविध धातुंच्या प्रतिमा चांदीची ब्रह्मदेव, सोने विष्णुची, तांबे शंकराची पंचामृत पुजा, फुले, तीळ, जव, पिंड साहित्य इत्यादी सदर साहित्य आपणास आणण्याची आवश्यकता नाही. वरील सर्व साहित्य गुरुजींना देत असलेल्या दक्षिणेमध्येच पुरविले जाते. |

## ✻ विधीसाठी येतांना दक्षिणेव्यतिरिक्त आपणासोबत आणावयाचे साहित्य ✻

| नारायणबली-नागबली | राहू कालसर्पयोग शांती | त्रिपिंडी श्राद्ध |
|---|---|---|
| नारायणबली-नागबली ह्या विधीसाठी तीन दिवस त्र्यंबकेश्वरी रहावे लागते.<br>• पुरुषांसाठी : १ मोठे धोतर, १ उपरणे(टॉवेल), १ अंडरपँड, १ बनियन इ.<br>• स्त्रियांसाठी : १ साडी(काळा रंग सोडून), १ ब्लाऊज, १ परकर इ. (कुर्ता, पायजमा व पंजाबी ड्रेस चालणार नाही.)<br>• १ ग्रॅम किंवा यथाशक्ती सुवर्ण नाग प्रतिमा सोबत आणावी किंवा येथे तयार करुन घ्यावी.<br>• या प्रतिमेचे तिसऱ्या दिवशी पूजन करुन गुरुर्जींना दान करावी लागते. | हा विधी एक दिवसाचा असून, ज्याचे जन्मप्रत्रिकेत हा दोष असेल त्या मुलाने अथवा मुलीने, लग्न झाले आसेल तर पती-पत्नीने पुजेस बसावे.<br>• पुरुषांसाठी : १ मोठे धोतर, १ उपरणे(टॉवेल), १ अंडरपँड, १ बनियन इ.<br>• स्त्रियांसाठी : १ साडी(काळा रंग सोडून), १ ब्लाऊज, १ परकर इ. (मुलास कुर्ता-पायजमा व मुलीस ड्रेसही चालेल काळारंग सोडून)<br>• अर्धा ग्रॅमची किंवा यथाशक्ती सुवर्ण नाग प्रतिमा सोबत आणावी किंवा येथे तयार करुन घ्यावी. या प्रतिमेचे पूजन करुन गुरुर्जींना दान करावी लागते. | हा विधी एक दिवसाचा असून पती-पत्नीने पुजेस बसावे. अविवाहीत असाल तर एकट्यानेच बसावे. फक्त मुलीस अथवा एकट्या स्त्रीस या पुजेस बसता येत नाही.<br>• पुरुषांसाठी : १ मोठे धोतर, १ उपरणे(टॉवेल), १ अंडरपँड, १ बनियन इ.<br>• स्त्रियांसाठी : १ साडी(काळा रंग सोडून), १ ब्लाऊज, १ परकर इ. ( कुर्ता-पायजमा व पंजाबी ड्रेस चालणार नाही.) |

टीप : ✻ सदर वस्त्रे व नागप्रितिमा त्र्यंबकेश्वर येथे दुकानात मिळतात. सदर वस्त्रे नवीन व सुतीच आणावीत. ✻ सदर वस्त्रे परिधान करुनच विधी केला जातो. नंतर ती वस्त्रे सोडून द्यावी लागतात. ✻ सदर वस्त्रे व सुवर्ण नागप्रतिमा गुरुजींना देत असलेल्या दक्षिणे व्यतिरिक्त आपणांस आणावयाचे असतात. (पुजेसाठी येणाऱ्या व्यक्तींनी आपल्यासोबत ओळखपत्र (पॅनकार्ड/शेषनकार्ड/आधारकार्ड) सोबत आणणे अनिवार्य आहेत. ✻ गुरुजी जन्मपत्रिकेबाबत मार्गदर्शन करतात. जन्मपत्रिका असल्यास सोबत आणावी.

## नारायणबली-नागबली, राहू कालसर्पयोग शांती, त्रिपिंडी श्राद्ध विधीचे सन २०२१-२२चे मुहूर्त

| महिना | नारायणबली-नागबली विधीचे मुहूर्त | राहु कालसर्प योग शांतीचे मुहूर्त | त्रिपिंडी श्राद्ध विधीचे मुहूर्त |
|---|---|---|---|
| ऑक्टोबर-२०२१ | ११(सो.), २१(गु.), २८(गु.) | १०, १३, १७, २३, २४, ३०, ३१ | १३, २३, ३० |
| नोव्हेंबर-२०२१ | ७(र.), ११(गु.), १८(गु.), २५(गु.), ३०(मं.)<br>(१ नोव्हेंबर ते ६ नोव्हेंबर दिवाळी ) | ७, ९, १३, १४, २०, २१, २७, २८ | ९ ,१३, २०, २७ |
| डिसेंबर-२०२१ | ८(बु), १४(मं.), २०(सो.), २४(शु.), २९(बु.) | २, ५, १०, १२, १६, १९, २२, २६, ३१ | २, १०, १६, २२, २६, ३१ |
| जानेवारी-२०२२ | ४(मं.), १०(सो.), १८(मं.), २४(सो.) | २, ६, ९, १२, १६, २०, २३, २६, ३० | ६, १२, २०, २६ |
| फेब्रुवारी-२०२२ | १(मं.), ७(सो.), १२(श.), १८(शु), २८(सो.) | ३, ६, ९, १३, १४, २०, २७ | ३, ९, १४, २० |
| मार्च-२०२२ | ६(र.), ११(शु), १९(श.), २४(गु.), २८(सो.) | २, ६, ८, १३, २०, २१, २६, २७, ३० | २, ८, १३, २१, २६, ३० |

आपले नम्र : श्री. मनोज काण्णव गुरुजी (त्र्यंबकेश्वर) मो. ९८२२०४३३२६